नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०३/२०२५ (गुरूवार) सकाळ**

---

## अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दि.१८/०३/२०२५ रोजी पोलीस ठाणे पारशिवणी परीसरात स्थानिक गुन्हे शाखा चे पथक पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली कि, पारशिवणी येथे राहणारा इसम नामे स्वप्नील देविदास कोल्हे हा त्याचे राहते घराचे समोर अंमली पदार्थ गांजा विक्री करतो. मिळालेल्या महीतीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने घटनास्थळी जावुन **स्वप्नील देविदास कोल्हे, वय २६ वर्ष, रा. वॉर्ड न.०३, घोगरा रोड, पारशिवणी ता. पारशिवणी** याला ताब्यात घेतले आणि नमुद आरोपीचे ताब्यातुन ४१२ ग्राम अंमली पदार्थ गांजा, किंमती ४१२०/— रुपये २) एक थैली कि ५/— रुपये असा एकुण ४१२५/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.

आरोपी नामे स्वप्नील देविदास कोल्हे, वय २६ वर्ष, रा. वॉर्ड न. ०३, घोगरा रोड, पारशिवणी ता. पारशिवणी याच्या विरूध्द पोलीस स्टेशन पारशिवणी येथे एन डी पी एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पारशिवणी पोलीस करत आहे.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक १९/०३/२०२५ रोजी खापरखेडा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा पोटा रेती घाट ,कन्हान येथे रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोटा रेती घाट कन्हान येथे पोहचले असता तेथे पोलीसांना मंहीद्रा बोलेरो पिकअप क्र. एम. एच. ४० सी टी ४३२६ मिळुन आले. पोलीसांना येताना पाहुन आरोपी घटनास्थळावरून पळुन गेले. पोलीसांनी घटनास्थळावरून **१)** मंहीद्रा बोलेरो पिकप क्र एम एच ४० सी टी ४३२६ आणि १.५ ब्रास रेती असा एकुण **०५,०६,००० /— रूपयांचा** मुद्देमाल जप्त केला आहे.

मंहीद्रा बोलेरो पिकप क्र एम एच ४० सी टी ४३२६ चा चालक /मालक **यांच्या** विरूध्द पोस्टे खापरखेडा येथे **कलम ३०३(२) , १०९ , ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर